| MHKO130013852016 | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | ०२/०८/२०१७ | | |
| | नोंदणी दिनांक | : | ०२/०८/२०१७ | | |
| | निकाल दिनांक | : | १४/०८/२०२६ | | |
| | कालावधी | : | वर्ष | महिने | दिवस |
| | | | ०९ | ०० | १२ |

**<u>प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, कागल जि.कोल्हापूर यांचे न्यायालयात</u>**

**<u>(पिठासीन अधिकारी श्रीमती प्रणिता सुहास पाटील)</u>**

**(न्यायनिर्णय घोषित दिनांक - १४ ऑगस्ट, २०२६)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र. १४८/२०१७ निशाणी क्र.६२/ब**

**गुन्हयाचा तपशिल :** गुन्हा नोंद क्र. ७६/२०१६, दिनांक २०/११/२०१६
**पोलीस स्टेशन :** मुरगूड पोलिस स्टेशन, मुरगूड.

| | | |
|---|---|---|
| **अभियोगपक्ष** | | **महाराष्ट्र सरकार**<br>मार्फत पोलीस ठाणे अंमलदार अधिकारी,<br>मुरगूड पोलीस स्टेशन, मुरगूड.<br>मूळ फिर्यादी नरेश बच्चाराम माने<br>रा. निपाणी वेस, कोडणी, ता.चिक्कोडी |
| **अभियोगपक्षातर्फे अभियोक्ता** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती<br>एस.ए.म्हामुलकर |
| **आरोपी** | | **बाबुराव साताप्पा कुंभार.**<br>वय –२२ वर्षे, धंदा- ड्रायव्हर,<br>रा. यमगे, ता.कागल, जि.कोल्हापूर. |
| **आरोपींतर्फे अभियोक्ता** | | श्री. पी.व्ही.चव्हाण |

**<u>भाग – ब</u>**

(फौजदारी आदेशिकांचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (ii) अन्वये )

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | : | २०/११/२०१६ |
| फिर्याद दाखल दिनांक | : | २०/११/२०१६ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | : | ०२/०८/२०१७ |
| दोषारोप निश्चित केल्याचा दिनांक | : | ०५/०९/२०१८ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | : | ०५/०९/२०१९ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | : | -- |
| न्यायनिर्णय दिनांक | : | १४/०८/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशाचा दिनांक | : | -- |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्रमांक | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.स. कलम ४२८ अन्वये समायोजित (set off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | बाबुराव साताप्पा कुंभार | ०५.१२. २०१६ | ०५.१२. २०१६ | भादंवि कलम ३०४-अ, २७९, सह मोटर वाहन कायदा कलम १३१(१)(ब) सह कलम १८७, १८४ अन्वये. | निर्दोष मुक्त | -- | -- |

## भाग – क

(फौजदारी आदेशिकाचे प्रकरण VI मधील परिच्छेद ४४ (iii) अन्वये )

**सरकारपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार / बचाव पक्षातर्फे साक्षीदार / न्यायालयीन साक्षीदार**

**अ. अभियोगपक्षातर्फे तपासण्यात आलेले साक्षीदार :-**

| सा.क्र. | साक्षीदाराचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | पांडुरंग मारुती कुंभार (अ.सा.क्र.१) | घटनास्थळ पंच साक्षीदार | १२ |
| २. | शहाजी दत्तात्रय कुंभार (अ.सा.क्र.२) | घटनास्थळ पंच साक्षीदार | १४ |
| ३. | नरेश बच्चाराम माने (अ.सा.क्र.३) | फिर्यादी | २९ |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | निलेश उमेश माने (अ.सा.क्र.४) | साक्षीदार | ३५ |
| ५. | आकाश उमेश माने (अ.सा.क्र.५) | साक्षीदार | ३६ |
| ७. | अमोल सुब्रराव तांबे (अ.सा.क्र.६) | तपासी अधिकारी | ५३ |

**ब. बचावपक्ष व न्यायालयामार्फत साक्षीदार तपासण्यात आले नाहीत.**

**अभियोगपक्ष / बचावपक्ष / न्यायालयामार्फत निशाणी देण्यात आलेली कागदपत्रे खालीलप्रमाणे -**

| अ.क्र. | दस्तऐवज | निशाणी |
|---|---|---|
| १ | मरणोत्तर पंचनामा (आरोपीने मान्य केल्याने) | २६ |
| २ | फिर्याद (अ.सा.क्र.३ यांनी सिध्द केल्याने ) | ३० |
| ३ | प्रथम खबर अहवाल (अ.सा.क्र.३ यांनी सिध्द केल्याने ) | ३१ |
| ४ | पुरवणी जबाब (अ.सा.क्र.३ यांनी सिध्द केल्याने ) | ३२ |
| ५ | घटनास्थळ पंचनामा (अ.सा.क्र. ६ यांनी सिध्द केल्याने) | ५४ |
| ६ | वाहन जप्ती पंचनामे (अ.सा.क्र. ६ यांनी सिध्द केल्याने) | ५५ व ५६ |
| ७ | वाहन तपासणी अहवाल/ यांत्रिकी निरीक्षण अहवाल (अ.सा.क्र. ६ यांनी सिध्द केल्याने) | ५७ व ५८ |
| ८ | मयताचे शवविच्छेदन अहवाल (अ.सा.क्र.६ यांनी सिध्द केल्याने) | ५९ |
| ९ | आरोपीस मो.वा.का.कलम २०९ प्रमाणे दिलेली नोटीस (अ.सा.क्र. ६ यांनी सिध्द केल्याने) | ६० |

## न्या य नि र्ण य

**(घोषित दिनांक १४ ऑगस्ट, २०२६)**

प्रस्तुत प्रकरणात आरोपीविरुध्द भारतीय दंड विधान, १८६० कलम ३०४-अ, २७९ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटरवाहन कायदा कलम १३४(१)(ब) सह कलम १८७, १८४ अन्वये दंडनीय अपराधांकरीता खटला चालवण्यात आला.

**०२. अभियोग पक्षाचे थोडक्यात कथन असे आहे की,**

दिनांक २०/११/२०१६ रोजी रात्री २०.३० वाजताचे सुमारास यमगे, ता.कागल गावचे हद्दीत मुरगूड ते निपाणी जाणारे रोडवर कुंभार गेट जवळ आरोपी याने त्याचे ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा भरधाव वेगाने, हयगयीने, अविचाराने, निष्काळजीपणे, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून अचानक डावीकडे घेतलेने समोरुन मुरगूड कडून येणारे हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक केए २३ इएन २५४९ ही टेंपोस पाठीमागे ठोकरुन त्यावरील चालक उमेश बच्चाराम माने यांना जोरात धडक देवून त्यांना गंभीर दुखापती करुन त्यांच्या मृत्यूस कारणीभूत होऊन मोटरसायकलचे नुकसान करुन अपघाताची वर्दी न देता निघुन गेला.

**०३.** सबब, सदर घटनेची फिर्याद नरेश बच्चाराम माने यांनी मुरगूड पोलीस स्टेशनमध्ये दिनांक २०/११/२०१६ रोजी नोंदवली. सदर फिर्यादीच्या अनुषंगाने आरोपीविरूध्द गुन्हा क्र.७६/२०१६ नोंदवण्यात आला. तपासाअंती आरोपीने भारतीय दंड विधान कलम ३०४-अ, २७९, ३३७, ३३८, ४२७ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटरवाहन कायदा कलम १३४(१)(ब), १८४, प्रमाणे गुन्हा केल्याचे निष्पन्न झाले. सबब, आरोपीविरूध्द सदरचे दोषारोपपत्र दिनांक ०२/०८/२०१७ रोजी दाखल करण्यात आले.

**०४.** माझे विद्वान पिठासीन पुर्वाधिकारी यांनी आरोपीविरूध्द भारतीय दंड विधान कलम ३०४-अ, २७९ (संक्षिप्त भा.दं.वि.) सह मोटरवाहन कायदा कलम १३४(१)(ब) सहकलम १८७, १८४ अन्वये आरोपाचा तपशील (नि.०९) निर्धारीत केले. सदर तपशील आरोपीला मातृभाषेत समजावून सांगितला असता त्यांनी आरोप नाकारले व खटला चालविण्याची मागणी केली.

५. अभियोग पक्षाच्या पुराव्याअंती, आरोपीचे फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ३१३ अन्वये निवेदन नि.६१ वर नोंदवण्यात आले. आरोपीने गुन्हा केल्याचे नाकारले व त्याच्याविरुध्द खोटी केस केल्याबाबतचे सांगितले.

०६. अभियोग पक्षातर्फे विद्वान अभियोक्ता श्रीमती एस.ए.म्हामुलकर व आरोपीतर्फे विद्वान अभियोक्ता श्री. पी.व्ही.चव्हाण यांचा तोंडी युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर दाखल कागदपत्रांचे अवलोकन केले. प्रस्तुत प्रकरणाच्या न्यायनिर्णयासाठी उद्भवलेले मुद्दे त्यावरील माझे निष्कर्ष व निष्कर्षामागील कारणमिमांसा मी खालीलप्रमाणे देत आहे:-

| अनु.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगााने, निष्काळजीपणे, रस्त्याचे व रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल क्रमांक केए २३ इएन २५४९ हिस पाठीमागे ठोकरुन त्यावरील चालक उमेश बच्चाराम माने यांना धडक देवून त्यांना गंभीर दुखापत होवून त्यांच्या मृत्यूस कारणीभुत होवून भा.दं. वि.कलम **३०४-अ** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **.... नाही.** |
| २. | आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा मानवी जिवीत धोक्यात येईल इतक्या बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगााने, निष्काळजीपणे, रहदारीचे नियमांकडे दुर्लक्ष करुन चालवून भा.दं.वि.कलम **२७९** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **.... नाही.** |
| ३. | आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा भरधाव वेगाने, बेदरकारपणे व निष्काळजीपणे रस्त्याचे परिस्थितीकडे व रहदारीकडे दुर्लक्ष करुन चालवून हिरो होंडा स्प्लेंडर मोटरसायकल | |

| | | |
|---|---|---|
| | क्रमांक केए २३ इएन २५४९ हिस पाठीमागे ठोकरुन त्यावरील चालक उमेश बच्चाराम माने यांना धडक देवून अपघात करुन पोलिसांना अपघाताची खबर न देता व जखमीस वैद्यकीय मदत न देता तेथून पळून जाऊन मोटार वाहन कायदा, १९८८ कलम **१३४(१)(ब) सह कलम १८७** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय? | **.... नाही.** |
| **४.** | आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून, बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, जनतेला धोकादायक ठरेल अशा रीतीने चालवून मोटार वाहन कायदा १९८८ कलम **१८४** अन्वये दंडनीय अपराध केला असल्याचे अभियोगपक्षाने सिद्ध केले आहे काय ? | **.... नाही.** |
| **५.** | अंतिम आदेश काय ? | **....आरोपीला निर्दोष मुक्त करण्यात येते.** |

## <u>का र ण मि मां सा</u>

### <u>मुद्दा क्र. १ ते ४ बाबत :-</u>

**०७.** मुद्दा क्र.१ ते ४ हे एकमेकांशी संलग्न असल्याने आणि अभिलेखावर असलेला पुरावा हा संयुक्तरित्या असल्याने मुद्दा क्र.१ ते ४ बाबतचे विवेचन एकत्रितरित्या घेतलेले आहे.

**०८.** सदर प्रकरणात अभियोग पक्षाने आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून, बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, जनतेला धोकादायक ठरेल अशा रीतीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून अचानक डावीकडे येऊन समोरुन येणारे हिरोहोंडा स्पलेंडर मोटरसायकल नं. केए २३ इएन २५४९ ही टेंपोस पाठीमागून ठोकरुन त्यावरील मोटरसायकल चालक

उमेश बच्चाराम माने यांना सदर अपघातात गंभीर दुखापती होऊन त्यांचे मृत्यूस कारणीभुत होऊन अपघाताची वर्दी न देता निघून गेला, हे नि:संशयपणे सिद्ध केले का हे पाहणे आवश्यक आहे.

**०९.** आरोपीवरील गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षातर्फे प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३), प्रत्यक्षदर्शी साक्षीदार निलेश (अ.सा.क्र.४), आकाश (अ.सा.क्र.५) यांचा नोंदविण्यात आलेला साक्षी पुरावा महत्वपूर्ण ठरतो. फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३) यांनी त्यांच्या साक्षीपुराव्यादरम्यान (नि.२९) त्यांचे भाऊ उमेश बच्चाराम माने यांचा सात ते आठ वर्षांपुर्वी निपाणी राधानगरी रोडवर कुंभार गेट यमगे ता.कागल येथे रात्री ८.३० ते ९.०० वाजताचे सुमारास अपघात झाल्याचे त्यांना त्यांचा चुलत भाऊ अशोक माने यांनी फोनवरुन अपघाताबाबत सांगितल्याचे कथन केले. सदर साक्षपुराव्यावरुन असे निदर्शनास येते की त्यानंतर ते लगेच घरी येऊन घटनास्थळी गेले असता तेथे त्यांच्या भावाला ॲम्ब्युलन्सने मुरगूड येथील दवाखान्यात नेल्याचे समजले, घटनास्थळी त्यांच्या भावाची गाडी तेथेच पडली होती, अपघातामुळे गाडीची हेडलाईट, टाकी तुटली होती, पुढचे चाक वगैरे सर्व मोडले होते, चार ते पाच हजार रुपयांचे नुकसान झाले होते.

**१०.** महत्वाचे म्हणजे, फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३) यांच्या पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की त्यांनी अपघात कसा झाला याबाबत चौकशी करुन पोलिस स्टेशनला जाऊन अज्ञात वाहन चालकाविरुद्ध फिर्याद व प्रथम खबर अहवाल (नि.३०, ३१) दिला. त्यानंतर त्यांना पोलिसांकडून समजले की त्यांच्या भावाच्या गाडीला टाटा ४०७ टेंपो या कंपनीच्या टेंपोने धडक दिली होती. महत्वाचे म्हणजे, सदर फिर्यादीने त्यांना टेंपोचा नंबर लक्षात नसल्याचे कथन करुन आरोपी त्यांना दाखविल्याचे व त्यांचे नाव बाबुराव कुंभार असे सांगितल्याचे तसेच दिनांक ०५/१२/२०१६ रोजी त्यांचा पुरवणी जबाब (नि.३२) दिल्याचे कथन करुन

सदर अपघातामध्ये त्यांचा भाऊ मयत झाल्याचे व अपघातामध्ये टेंपो चालकाची चुक असल्याचे कथन केले.

**११.** फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३) यांचा आरोपीतर्फे घेण्यात आलेला उलटतपास महत्वपूर्ण ठरतो. फिर्यादीने उलटतपासादरम्यान कोडणी ते यमगे हे अंतर अंदाजे १७ ते १८ किलोमीटर, कोडणी ते निपाणी हे अंतर अंदाजे ६ किलोमीटर, निपाणी ते यमगे हे अंतर २० किलोमीटर असल्याचे कथन करुन कोडणी हे निपाणीजवळ असल्याचे व यमगेला जाणेसाठी कोडणीवरुन निपाणीस येऊन यमगेला जावे लागत असल्याचे कथन केले. महत्वाचे म्हणजे, सदर साक्षीदाराने यमगे ते निपाणी हा रस्ता राष्ट्रीय महामार्ग असून रस्ता रहदारीचा असल्याचे मान्य करुन सदरचा अपघात त्यांनी प्रत्यक्षात पाहिलेला नसल्याचे व अपघात झाला ही त्यांची ऐकीव बातमी असल्याचे स्पष्टपणे मान्य केले.

**१२.** विशेष म्हणजे, फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३) यांनी नि.३० वरील फिर्याद त्यांनी अज्ञात इसमाविरुद्ध दिल्याचे, ते घटनास्थळी गेले तेव्हा टाटा टेंपो ४०७ हा तेथे त्यांना दिसला नसल्याचे तसेच त्यांनी टाटा टेंपो ४०७ च्या चालकास प्रत्यक्ष पाहिले नसल्याचे स्पष्टपणे मान्य केले. सदर फिर्यादीने पोलिसांनी त्यांना सांगितल्यामुळे त्यांना टेंपो हा टाटा टेंपो ४०७ असल्याचे समजल्याचे स्पष्टपणे मान्य करुन नि.३० वरील फिर्याद देताना सदर अपघातामध्ये टेंपो चालकाची चुक असल्याचे सांगितले नसल्याचे मान्य केले.

**१३.** फिर्याद (नि.३०) व प्रथम खबर अहवाल (नि.३१) चे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की दिनांक २०/११/२०१६ रोजी रात्री ८.३० वाजताच्या सुमारास फिर्यादी नरेश यांचा भाऊ उमेश बच्चाराम माने हा त्याचे मोटरसायकलवरुन मुरगूड ते निपाणी येत असताना कुंभार गेट यमगे, ता. कागल या ठिकाणी मोटरसायकलला कोणीतरी अज्ञात वाहनाने हयगयीने वाहन चालवून धडक

दिल्याने तो गंभीर जखमी होऊन जागीच मयत झालेला असून सदर अपघातामध्ये मोटरसायकलचे अंदाजे चार हजार रुपयांचे नुकसान झाल्याने अपघात करणारे वाहन चालकाने अपघाताची वर्दी न देता तो पळुन गेला असल्याने अज्ञात वाहन चालकाविरुद्ध फिर्यादी नरेश यांनी फिर्याद दिली आहे.

**१४.** अभिलेखाचे अवलोकन केले असता प्रस्तुत गुन्हयाचे अनुषंगाने फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३) यांचा पुरवणी जबाब (नि.३२) दिनांक ०५/१२/२०१६ रोजी नोंदविलेला असून सदर जबाबाचे अवलोकन केले असता असे निदर्शनास येते की सदर दिवशी त्यांना एक इसम दाखवून याचेच टाटा ४०७ टेंपा नं.एमएच १० के ६१४८ ने उमेश बच्चाराम माने याचे हिरो होंडा मोटरसायकलला धडक दिल्याचे सांगितल्यावर त्यांनी त्यास नाव पत्ता विचारता त्याने त्याचे नाव बाबुराव सातापा कुंभार असे सांगून त्याने हकीकत सांगितली की तो कुंभार गेट येथून वरील टाटा ४०७ टेंपो घेऊन निपाणी राधानगरी रोडवर आले असता समोरुन एक मोटरसायकल आलेने टेंपो डावीकडे घेत असताना तो टेंपोचे उजवे बाजूस पाठीमागे धडकला व रस्त्यावर पडला तेव्हा त्याची काहीच हालचाल दिसेना म्हणून तो टेंपो घेऊन तसाच पुढे गेला. वास्तविक पाहता, दिनांक ०५/१२/२०१६ रोजी नोंदविलेल्या पुरवणी जबाबादरम्यान सदर फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३) यांनी आरोपीचे नाव, त्याच्या ताब्यातील टेंपोचा नंबर सांगितल्याचे दिसून येते.

**१५.** निलेश (अ.सा.क्र.४) हे प्रस्तुत अपघातातील मयत उमेश बच्चाराम माने यांचा मुलगा असून दिनांक २०/११/२०१६ रोजी त्यांना त्यांच्या वडीलांचा अपघात झाल्याबाबत समजल्याने ते व त्यांचे चुलते नरेश असे यमगे येथील राधानगरी रोडवर अपघात झालेल्या ठिकाणी गेले असता त्यांची गाडी हॅण्डल, पंखा तुटलेले दिसले, चाक बेंड झालेले होते, गाडीच्या बाजुला त्यांचे वडील पडलेले होते, कानातून रक्त येत होते, कपाळाला लागल्याचे व त्यानंतर त्यांनी वडीलांना

ॲम्ब्युलन्समधून मुरगूड रुग्णालयात नेल्याचे त्यांच्या तोंडी पुराव्या दरम्यान कथन केले. याउलट, नरेश (अ.सा.क्र.३) यांनी घटनास्थळी गेल्यावर त्यांच्या भावाला ॲम्ब्युलन्सने मुरगूड रुग्णालयात नेल्याचे समजल्याचे कथन केलेले आहे. निलेश (अ.सा.क्र.४) यांनी घटनेवेळी त्यांना कसा अपघात झाला हे समजले नसल्याचे स्पष्ट कथन करुन यमगे गावातील बाबुराव कुंभार यांनी त्यांच्या टेंपोने त्यांच्या वडीलांच्या मोटरसायकलला पाठीमागून धडक देऊन अपघात करुन त्या अपघातात त्यांचे वडील मयत झालेचे व टेंपोचा नंबर एमएच १० के ६१४८ असल्याचे समजल्याचे कथन केले.

**१६.** निलेश (अ.सा.क्र.४) यांनी आरोपीतर्फे घेणेत आलेल्या उलटतपासादरम्यान खालीलप्रमाणे बाबी मान्य केलेल्या आहेत : १) प्रत्यक्ष घटना त्यांनी पाहिलेली नसून अपघाताची माहिती ही त्यांची ऐकीव माहिती आहे, २) आरोपीचे नाव व टेंपोचा नंबर त्यांना पोलिसांनी सांगितला म्हणून माहिती झाला, ३) वडीलांच्या अपघातमुळे व मोटरसायकलचा इन्शुअरन्स असल्यामुळे त्यांनी सदरचा इन्शुअरन्स क्लेम केल्याने इन्शुअरन्सची रक्कम त्यांना मिळालेली आहे, ४) बाबुराव कुंभार हे नाव त्यांना पोलिसांनी सांगितले म्हणून माहिती झाले, ५) अपघातस्थळी ते गेले तेव्हा लोक जमले होते, जमलेल्या लोकांनी त्यांना सुरुवातीला त्यांच्या वडीलांनी टेंपोला पाठीमागून धडक दिल्याचे सांगितले होते.

**१७.** आकाश (अ.सा.क्र.५) हे प्रस्तुत अपघातातील मयत उमेश बच्चाराम माने यांचा मुलगा असून दिनांक २०/११/२०१६ रोजी त्यांना त्यांच्या वडीलांचा अपघात झाल्याबाबत समजल्याने ते, त्यांचा भाऊ व त्यांचे चुलते नरेश असे यमगे येथील राधानगरी रोडवर अपघात झालेल्या ठिकाणी गेले असता तेथे टेंपो व त्यांच्या वडीलांच्या दुचाकीचा अपघात झाल्याचे सदर साक्षीदाराने कथन केले. सदर साक्षीदाराच्या कथनानुसार तेथे पोहचण्याआधी लोकांनी त्यांच्या वडीलांना मुरगूड येथील दवाखान्यात नेले होते. डॉक्टरांनी त्यांचे वडील मयत झाल्याचे

सांगितले व नंतर पोलिसांनी सांगितले की सदर टेंपो बाबुराव कुंभार चालवत होता. सदर साक्षीदाराचे पुराव्यावरुन असे निदर्शनास येते की प्रत्यक्ष घटना त्यांनी पाहिलेली नसून अपघाताची माहिती ही त्यांची ऐकीव माहिती आहे.

१८. प्रस्तुत प्रकरणातील घटनास्थळ पंचनामा सिध्द करण्याकरीता अभियोग पक्षाने पंच साक्षीदार पांडुरंग (अ.सा.क्र.१) व शहाजी (अ.सा.क्र.२) यांची साक्ष अभिलेखावर नोंदविलेली असून सदर साक्षीपुराव्यावरुन असे निदर्शनास येते की, सदर साक्षीदारांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नसून घटनास्थळ पंचनाम्यातील मजकूराबाबत अनभिज्ञता दर्शविली. प्रस्तुत प्रकरणातील वाहन जप्ती पंचनामेचे पंच सुरेश ईश्वरा गंगाधरे यांना साक्षकामी साक्षीसमन्स काढले असता ते मयत झाल्याचा अहवाल व त्यांचे मृत्यू प्रमाणपत्र अभिलेखावर दाखल झाले असल्याने अभियोगपक्षास प्रस्तुत प्रकरणातील वाहन जप्ती पंचनामे पंच साक्षीदारामार्फत सिद्ध करता आले नाहीत.

१९. प्रस्तुत प्रकरणातील तपास पोलिस उपनिरिक्षक अमोल तांबे (अ.सा.क्र.६) यांनी केलेला असून प्रस्तुत प्रकरणातील तपासाच्या अनुषंगाने त्यांनी घटनास्थळ पंचनामा (नि.५४) करुन मरणोत्तर पंचनामा श्री. माळवदे यांनी दिल्याने प्रस्तुत प्रकरणात दाखल केला. गुन्हयातील दोनी वाहने ताब्यात घेऊन त्याबाबतचा पंचनामा दोन पंचांसमक्ष (नि.५५ व ५६ ) केला. सदरची वाहने जप्त करुन आरटीओकडे तपासणीसाठी पाठवून त्याबाबतचे अहवाल (नि.५७ व ५८) दाखल केले. शवविच्छेन अहवाल (नि.५९) प्राप्त करुन साक्षीदरांकडे चौकशी करुन त्यांचे जबाब नोंदविले. आरोपीला मो.वा.कायदा कलम २०९ प्रमाणे नोटीस (नि.६०) देऊन आरोपीविरुध्द सबळ पुरावा मिळाल्याने आरोपीविरुध्द दोषारोपपत्र दाखल केले. सदर तपासी अंमलदारांनी मुरगूड निपाणी रस्ता हा रहदारीचा रस्ता असल्याचे, प्रस्तुत प्रकरणातील सर्व साक्षीदार हे मयताचे नातेवाईक असून कोडणी

गावचे असल्याचे स्पष्टपणे मान्य करुन त्यांच्याकडे तपासाबाबत लेखी आदेश नसल्याचे मान्य केले.

२०. उपरोक्त नमुद कारणमिमांसेचा विचार करता असे निदर्शनास येते की प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादी नरेश (अ.सा.क्र.३), साक्षीदार निलेश (अ.सा.क्र.४), आकाश (अ.सा.क्र.५) हे सर्वजण प्रस्तुत अपघातातील मयताचे नातेवाईक असून त्यांनी प्रत्यक्षात सदरचा अपघात पाहिलेला नाही अथवा आरोपी घटनेवेळी सदरचे वाहन चालवत असल्याचे देखील पाहिलेले नाही. फिर्याद (नि.३०) मध्ये फिर्याद ही अज्ञात इसम व अज्ञात वाहनाविरुद्ध दिल्याचे स्पष्टपणे नमुद आहे. प्रस्तुत प्रकरणातील पंच साक्षीदार पांडुरंग (अ.सा.क्र.१) व शहाजी (अ.सा.क्र.२) यांनी अभियोगपक्षास सहाय्य केलेले नाही. घटनास्थळ हे रहदारीचा रस्ता असून देखील तसेच अपघातावेळी लोक जमा झाले असून देखील तपासी अंमलदारांनी प्रस्तुत अपघाताच्या व गुन्हयाच्या अनुषंगाने प्रत्यक्षदर्शी साक्षीदारांचे जबाब नोंदविले नसल्याचे अभिलेखावरील कागदपत्रांवरुन स्पष्ट होते.

२१. वास्तविक पाहता, प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्षातर्फे आरोपीने वाहन चालवितांना रहदारीच्या अथवा वाहतुकीच्या निश्चीत कोणत्या नियमांचे उल्लंघन केले याबाबत कोणताही पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही. सदर गाडीशी आरोपीचे संबंध प्रस्थापित करणारा तसेच घटनेवेळी आरोपी सदर गाडी निष्काळजीपणे, बेदरकारपणे, वाहतुकीच्या नियामांकडे दुर्लक्ष करुन चालवत असल्याबाबत कोणताही पुरावा अभियोग पक्षाने अभिलेखावर दाखल केलेला नाही. वास्तविक पाहता, सदरचा अपघात आरोपीच्या निष्काळजीमुळे, बेदरकारपणे व भरधाव वेगाने वाहन चालविल्यामुळे झाला याबाबत कोणताही प्रत्यक्षदर्शी पुरावा अभिलेखावर दाखल करण्यात आलेला नाही. त्यामुळे एकंदरीतच, अभियोग पक्षाच्या कथनानुसार आरोपीने सदरचा गुन्हा केला याबाबत साशंकता निर्माण होते.

**२२.** अभियोग पक्षाने सदरचा अपघात आरोपीच्या निष्काळजीपणामुळे, हयगयीपणामुळे तसेच वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करुन वाहन चालविल्यामुळे घडला ही बाब नि:संशयपणे सिध्द केलेली नाही असे दिसून येते. वास्तविक पाहता, प्रत्यक्षात सदरचा अपघात निश्चित कोणाच्या हयगयीमुळे, निष्काळजीपणामुळे घडला याबाबत साशंकता निर्माण होते. तसेच अभियोग पक्षाने आरोपीने वाहतुकीच्या कोणत्या नियमांचे निश्चित कोणत्या प्रकारे उल्लंघन केले याबाबत कोणताही ठोस पुरावा अभिलेखावर दाखल केलेला नाही.

**२३.** एकंदरीत, अभियोग पक्षाने भारतीय दंड विधान कलम ३०४-अ, २७९ सह मोटरवाहन कायदा कलम १३४(१)(ब) सहकलम १८७, १८४ मधील घटकांची पूर्तता केलेली नाही. तसेच अभियोग पक्षाने आरोपीने त्याच्या ताब्यातील टाटा ४०७ टेंपो क्रमांक एमएच १० के ६१४८ हा वाहतुकीच्या नियमांकडे दुर्लक्ष करून, बेदरकारपणे, अविचाराने, हयगयीने, भरधाव वेगाने, निष्काळजीपणे, जनतेला धोकादायक ठरेल अशा रीतीने, रस्त्याच्या परिस्थितीकडे दुर्लक्ष करुन चालवून अचानक डावीकडे येऊन समोरुन येणारे हिरोहोंडा स्पलेंडर मोटरसायकल नं. केए २३ इएन २५४९ ही टेंपोस पाठीमागून ठोकरुन त्यावरील मोटरसायकल चालक उमेश बच्चाराम माने यांना सदर अपघातात गंभीर दुखापती होऊन त्यांचे मृत्यूस कारणीभुत होऊन अपघाताची वर्दी न देता निघून गेला, ही बाब नि:संशयपणे सिध्द केलेली नाही.

**२४.** आरोपीवरील आरोप ज्या घटनेवर आधारीत आहेत, ती घटनाच पुराव्याअभावी अभियोगपक्षाने सिध्द न केल्याने सदरचे आरोप तंतोतंतपणे सिध्द करण्यास अभियोग पक्ष अपयशी झाले आहेत, असे म्हणता येईल. यावरुन सदर घटनेशी आरोपीचा संबंध प्रस्थापित करण्यास अभियोग पक्ष अपयशी ठरला आहे, असे स्पष्ट होते. प्रस्तुत खटल्याबाबत पोषक असा पुरावा अभियोगपक्षाने न दिल्याने

प्रस्तुत प्रकरणातून आरोपीला निर्दोष मुक्त करणे न्यायोचित ठरते. सबब, मी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी नोंदवित आहे.

**मुद्दा क्र. ५ बाबत :-**

**२५.** ज्याअर्थी मुद्दा क्र.१ ते ४ चे निष्कर्ष नकारार्थी देण्यात आलेले आहेत, त्यावरुन हे स्पष्ट झालेले आहे की, अभियोग पक्षाने आरोपीवर ठेवण्यात आलेले आरोप नि:संशयपणे सिध्द केलेले नाहीत. सबब, मुद्दा क्र. ५ चे उत्तराचे अनुषंगाने मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे:-

## आ दे श

**१.** आरोपी **बाबुराव साताप्पा कुंभार** यांची भारतीय दंड विधान, १८६० कलम ३०४-अ, २७९ आणि मोटार वाहन कायदा, १९८८ चे कलम १३४(१)(ब) सह कलम १८७, १८४ अन्वये असलेल्या आरोपांतून फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

**२.** आरोपीचे जामीनबंध रद्द करण्यात येतात.

**३.** आरोपीने फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम ४३७-अ अन्वये पूर्ततेसाठी रक्कम रु.१५,०००/- (रक्कम रुपये पंधरा हजार) चे वैयक्तिक बंधपत्र द्यावे व तितक्याच रकमेचा जामीन द्यावा.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात पारीत व अधिघोषित करण्यात आला.)**

PRANITA SUHAS PATIL Digitally signed by PRANITA SUHAS PATIL Date: 2026.08.14 19:15:35 +0530

**कागल.** **(प्रणिता सुहास पाटील)**
**दि. : १४/०८/२०२६** **न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, कागल.**